**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय**
**वनभवन, रामगिरी रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४०००१**

**ई-मेलव्दारे/पत्र**

क्रमांक : कक्ष-१०(२)/एक/GR/प्र.क्रं.४०(१८-१९)/**२१०३**
नागपूर ४४०००१, दिनांक: **१२/१२/२०१८**

विषय:- शासकीय पत्रे निर्गमित करतांना तसेच टिप्पणी सादर करतांना कार्यालयीन कार्यपध्दती नियम पुस्तिकेतील तरतुदींचे पालन करण्याबाबत

संदर्भ:-१) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १००५/५६६/ प्र.क्र.३०/२००५/१८(र.व.का.), दिनांक १६/६/२००५

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. १२९/१८(र.व.का.), दिनांक १७/१०/२०१५

३) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१६/ प्र.क्र. २९/१८(र.व.का.), दिनांक १०/२/२०१६

४) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१८/प्र. क्र. ८१/१८(र.व.का.), दिनांक ३०/५/२०१८

५) या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-१३/आस्था-१/१७८९/२०१८-१९ दिनांक १४/९/२०१८

६) या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-१३/आस्था-१/१८८६/२०१८-१९, दिनांक २७/९/२०१८

कार्यालयीन कार्यपध्दती नियम पुस्तिकेतील ५३ (८) येथील तरतुदीनुसार शासकीय पत्रे निर्गमित करतांना पत्रांवर स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्याने स्वाक्षरीखाली कंसामध्ये नाव व त्याखाली पदनामाचा उल्लेख करण्याबाबत तसेच कार्यालयीन कार्यपध्दती नियम पुस्तिकेतील ३२ (१०) येथील तरतुदीनुसार टिप्पणी सादर करतांना अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व दिनांक नमूद करणे आवश्यक असल्याबाबत संदर्भिय शासन परिपत्रकान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

२. कोणताही संदर्भ निकाली काढण्यासाठी टिप्पणी चढत्या क्रमानुसार टिप्पणी नस्तीत सादर केल्या जाते व टिप्पणी ज्या अधिकाऱ्यांना चिन्हांकित करण्यात येते, त्या अधिकाऱ्यांचे पदनाम टिप्पणीवर दर्शविण्यात येते, तथापि त्यामध्ये संबंधित अधिकाऱ्याचे व टिप्पणी सादर करणाऱ्या कर्मचारी व अधिकारी यांचेही नाव नमूद करण्यात येत नसल्याने भविष्यात टिप्पणी लेखनाबाबत काही समस्या उद्भवल्यास टिप्पणी मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्याचा शोध घेणे कठीण होते. नस्तीमध्ये कार्यालयीन टिप्पणी सादर करतांना अधिकाऱ्यांच्या स्तरानुसार क्रमाने चिन्हांकित करावी व त्यांचे नावही लिहावी, असे चिन्हाकंन करतांना ज्यांना टिप्पणी सादर करण्यात येत आहे, त्या संबंधित अधिकाऱ्यांनी टिप्पणी खाली स्वाक्षरी करतांना दिनांक नमूद करावा. चिन्हाकंन करतांना संबंधित अधिकाऱ्याचे आडनाव सारखेच असल्यास आडनावापूर्वी

त्यांची आद्याक्षरे सुध्दा नमूद करावे. अशा शासनाच्या सूचना आहेत. या संदर्भात या कार्यालयाचे संदर्भिय पत्र दिनांक २७/९/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे. तसेच शासकीय पत्र निर्गमित करतांना पत्रावर स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्याने स्वाक्षरीखाली कंसामध्ये नाव व त्याखाली पदनामाचा उल्लेख करणे आवश्यक असल्याबाबत शासनाच्या सूचना असल्याने त्यानुसार या कार्यालयाचे संदर्भिय पत्र दिनांक १४/९/२०१८ अन्वये सदर सूचांनाचा पालन करण्यास सर्वांना कळविण्यात आले आहे.

३. संदर्भिय शासन परिपत्रकान्वये निर्गमित केलेल्या सूचनेच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत या कार्यालयाचे पत्र दिनांक १४/९/२०१८ व दिनांक २७/९/२०१८ अन्वये कळविण्यात आले असून सूध्दा असे निदर्शनास आले आहे की, अद्यापही काही अधिकारी, हे पत्रावर केवळ पदनाम नमूद करून स्वाक्षरी करतात. तसेच काही अधिकारी पत्रांवर स्वत:चे नाव/पदनाम नमूद न करता वरिष्ठ अधिकाऱ्याचे पदनाम नमूद करून “करीता” असा उल्लेख करून स्वाक्षरी करतात. ही बाब प्रशासकीय दृष्टीकोणातून योग्य नाही.

४. सबब, शासनाच्या वतीने करण्यात येणारा सर्व पत्रव्यवहार/प्रत्येक कागदपत्र/आदेश/पावती व इतर कोणत्याही प्रकारच्या दस्तऐवजावर स्वाक्षरी करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांनी स्वाक्षरीखाली स्वत:चे नाव, पदनाम व कार्यालय स्पष्ट नमूद करावे तसेच कोणत्याही परिस्थितीत वरिष्ठ अधिकाऱ्याचे पदनाम नमूद करून “करीता” असा उल्लेख करून पत्रे निर्गमित करण्यात येणार नाही, याची काळजी घेण्यात यावी. त्यासोबतच वरिष्ठांकडे टिप्पणी सादर करतांना संबंधित अधिकाऱ्याचे व टिप्पणी सादर करणाऱ्या कर्मचारी व अधिकारी यांचेही नाव नमूद करण्याची काळजी घेण्यात यावी, ही विनंती.

(ए.आर.मंडे)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(प्रशासन दुय्यम संवर्ग)

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, म.रा.पुणे
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा सदस्य सचिव, म.रा.जैवविविधता मंडळ, नागपूर
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व नागपूर/पश्चिम मुंबई
४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई
५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्य आयोजना), पुणे
६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संसोधन, शिक्षण व प्रशिक्षण), पुणे
७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळ, नागपूर
८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर
९) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), सर्व
१०) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक व्याघ्र प्रकल्प (सर्व)
११) मुख्य वनसंरक्षक (कार्य आयोजना), नागपूर
१२) मुख्य वनसंरक्षक (मूल्यांकन), नागपूर
१३) मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण), पुणे

१४) मुख्य वनसंरक्षक तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य प्राणि संग्रहालय प्राधिकरण, नागपूर

१५) महासंचालक, कुंडल प्रशासन विकास व व्यवस्थापन अकादमी, कुंडल

१६) वन संरक्षक तथा क्षेत्रसंचालक, व्याघ्र प्रकल्प (सर्व)

१७) वन संरक्षक (वन्यजीव), नाशिक / पुणे

१८) वन संरक्षक (संशोधन), पुणे

१९) वन संरक्षक, सामाजिक वनीकरण, सर्व

<u>प्रतिलिपी ई-मेल व्दारे:-</u>

१) प्रधान मुख्य वन संरक्षक (वनबल प्रमुख), म.रा. नागपूर

२) प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव), म.रा. नागपूर

३) प्रधान मुख्य वन संरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), म.रा.नागपूर

४) अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास)

५) अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (संधारण)

६) अपर प्रधान मुख्य वन संरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी

७) अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (संरक्षण)

८) अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (कार्मिक)

९) अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (अकाष्ठ वनोपज)

१०) अपर प्रधान मुख्य वन संरक्षक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (महा कॅम्पा)

प्रत:- (माहिती व उचित कार्यवाही करिता)

१) प्रशासकीय अधिकारी, कक्ष-१३

२) कक्ष अधिकारी, कक्ष-७ (१)

३) कक्ष अधिकारी, कक्ष-१० (अ)